आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
२२ मे २०२५ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- देशभरातल्या १०३ अमृत रेल्वे स्थानकांचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन, राज्यातल्या १५ रेल्वे स्थानकांचा समावेश

- ऑपरेशन सिंदूरबाबत भारताची भूमिका मांडण्यासाठी खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळाची संयुक्त अरब अमिरातीच्या मंत्र्यांशी चर्चा

- पावसाळ्यात जीवीत आणि मालमत्तेची हानी रोखण्यासाठी राज्यातल्या सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी सुटीच्या दिवसांसह २४ तास सज्ज राहावं, असे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

**आणि**

- येत्या दोन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात जोरदार पावसाची शक्यता/ रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांना रेड अलर्ट

**<><><><>**

ऑपरेशन सिंदूर अंतर्गत दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त करून भारतानं पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर दिल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज राजस्थानमध्ये बिकानेर इथं विविध विकास कामांच्या उदघाटन प्रसंगी बोलत होते. पाकिस्तान भारताबरोबरचं थेट युद्ध कधीच जिंकू शकत नाही, त्यामुळे दहशतवादाला प्रोत्साहन देऊन छुपं युद्ध खेळत आहे. पहलगाम इथल्या हल्ल्यानंतर संपूर्ण देश दहशतवादा विरोधात एकवटल्याचं ते यावेळी म्हणाले. यापुढे पाकिस्तानबरोबरची चर्चा केवळ पाक-व्याप्त काश्मीरवर केंद्रित असेल, असं प्रधानमंत्र्यांनी स्पष्ट केलं.

प्रधानमंत्र्यांनी आज बिकानेर इथून दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून देशातल्या १८ राज्यांमधल्या १०३ अमृत रेल्वे स्थानकांचं उदघाटन केलं. यात महाराष्ट्रातल्या १५ रेल्वे स्थानकांचा समावेश आहे. परळ, चिंचपोकळी, वडाळा रोड, माटुंगा ही मुंबई उपनगरीय रेल्वे स्थानकं, त्याशिवाय सावदा, लोणंद, नेताजी सुभाषचंद्र बोस इतवारी जंक्शन, केडगाव, लासलगाव, मूर्तिजापूर जंक्शन, देवळाली, धुळे, सावदा, चांदा फोर्ट आणि आमगाव या

स्थानकांचा यात समावेश आहे. प्रधानमंत्री मोदी यांनी या कार्यक्रमात बिकानेर-मुंबई एक्सप्रेस गाडीला हिरवा झेंडा दाखवला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन मुंबईतल्या परळ रेल्वे स्थानकातून दूरस्थ पद्धतीनं या कार्यक्रमात सहभागी झाले. अमृत भारत स्थानक योजनेतून मुंबई शहराचं वैभव असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस इमारतीचा पुनर्विकास करणार असून, त्यासाठी दोन हजार आठशे कोटी रुपयांचा निधी उपलब्ध केला जाईल असं फडनवीस यांनी यावेळी सांगितलं. जळगाव जिल्ह्यातल्या सावदा रेल्वे स्थानकावरून केंद्रीय क्रीडा आणि युवा कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे या कार्यक्रमात सहभागी झाल्या.

**<><><><>**

दहशतवादाविरोधात भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी ऑपरेशन सिंदूर अंतर्गत, सात बहुपक्षीय प्रतिनिधिमंडळं येत्या १५ दिवसांत ३२ वेगवेगळ्या देशांना भेटी देणार आहेत. खासदार **श्रीकांत शिंदे** यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळानं आज सकाळी संयुक्त अरब अमिरातीत तिथले सलोखा मंत्री शेख नाहयान बिन मुबारक अल नाहयान यांच्याबरोबर चर्चा केली.

खासदार **संजय कुमार झा** यांच्या नेतृत्वाखालचं शिष्टमंडळ देखील आज जपानला पोहोचलं. दहशतवादाविरुद्धच्या लढाईत भारताला दृढ असल्याची ग्वाही जपानच्या नेत्यांनी दिली.

द्रमुक खासदार **कनिमोळी करुणानिधी** यांच्या नेतृत्वाखाली तिसरं शिष्टमंडळ स्पेन, ग्रीस, स्लोव्हेनिया, लाटविया आणि रशिया या पाच देशांच्या दौऱ्यावर रवाना झालं आहे.

खासदार बैजयंत पांडा, खासदार रविशंकर प्रसाद, खासदार शशी थरूर आणि खासदार सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखालची इतर चार शिष्टमंडळं येत्या काही दिवसांत वेगवेगळ्या देशांना रवाना होतील.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या रविवारी २५ तारखेला आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून देशोदेशीच्या श्रोत्यांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा १२२ वा

भाग असेल. नागरीकांना या कार्यक्रमासाठी आपल्या सूचना आणि विचार १८०० ११ ७८०० या नि:शुल्क क्रमांकावर २३ मे पर्यंत पाठवता येतील.

**<><><><>**

ऑपरेशन सिंदूरच्या गौरवार्थ विविध ठिकाणी तिरंगा यात्रा काढण्यात येत आहेत. **नांदेडमध्ये** आज शिवसेनेनं आमदार हेमंत पाटील आणि आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या नेतृत्वात तिरंगा मोटरसायकल रॅली काढली. **धाराशिव** शहरात देखील आज तिरंगा यात्रा काढण्यात आली. या रॅलीमध्ये शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांसह शाळा-महाविद्यालयाचे विद्यार्थी, वारकरी, माजी सैनिक, आणि नागरिक मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते.

रत्नागिरी जिल्ह्यातले माजी सेना अधिकारी लेफ्टनंट कर्नल प्रशांत चतुर यांनी ऑपरेशन सिंदूरबाबत प्रतिक्रिया दिली….

**होल्ड बाईट -प्रशांत चतुर (३३ सेकंद)**

**<><><><>**

पावसाळ्यात जीवीत आणि मालमत्तेची हानी रोखण्यासाठी राज्यातल्या सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी सुटीच्या दिवसांसह २४ तास सज्ज राहण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिले आहेत. ते मोसमी पावासाच्या पूर्वतयारीच्या आढावा बैठकीत बोलत होते.

आपत्तीच्या वेळी तात्काळ प्रतिसाद देणे महत्वाचे आहे. त्यासाठीची कार्यपद्धती योग्यरित्या राबवावी. पश्चिम महाराष्ट्रात यंदा अधिक पावसाचा अंदाज पाहता सांगली आणि कोल्हापूर महानगरपालिकांनी विशेष तयारी ठेवावी. दरड कोसळण्याच्या जागी तातडीनं सुरक्षा उपाययोजना कराव्यात, असंही त्यांनी यावेळी सांगितलं.

या आढावा बैठकीला नौदल, वायुदल, सैन्यदल, सागरी सुरक्षा दल, एनडीआरअफ, एसडीआरएफ, जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्टचे अधिकारी, तसंच सर्व संबंधित विभागांचे मंत्री आणि अधिकारी उपस्थित होते.

**<><><><>**

आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक  बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
२२ मे २०२५ - गुरुवार

नाशिक जवळ इगतपुरी इथल्या जिंदाल कंपनीत दोन दिवसांपूर्वी लागलेली आग अद्याप आटोक्यात आलेली नाही.  या कारखान्यातल्या गॅस टाक्यांचा स्फोट होण्याची शक्यता असल्यानं एक किलो मीटर परीसरातली सर्व गावं निर्मुनष्य केली आहे. आग आटोक्यात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू असून लगतच्या अनेक जिल्ह्यांमधून तसेच औद्योगिक क्षेत्रांतल्या कंपन्यांकडून बंब आणि इतर उपकरणं आणली जात आहेत.

या आगीत कंपनीचे दोन कामगार जखमी झाले आहेत. खबरदारीचा उपाय म्हणून एनडीआरएफची तुकडी तैनात केली आहे. उपविभागीय अधिकाऱ्यांनी तीन किलो मीटर क्षेत्रात जमावबंदी जाहिर केली असून आपत्ती संपुष्टात येईपर्यंत कोणत्याही प्रकारचे राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रम घ्यायला मनाई केली आहे.

**<><><>**

जागतिक बाजारातल्या कमकुवत स्थितीच्या पार्श्वभूमीवर आज देशातल्या शेअर बाजारात सकाळच्या सत्रापासून घसरणीचा जोर राहिला. दिवसअखेर मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स ६४५ अंकांनी घसरला आणि ८० हजार ९५२ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी २०४ अंकांनी घसरला आणि २४ हजार ६१० अंकांवर बंद झाला.

**<><><>**

मोसमी पावसाचं आगमन होण्यापूर्वीच राज्याच्या विविध भागात पावसान जोरदार हजेरी लावली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात मंगळवार पासून सुरु झालेला वादळी पावसाचा जोर आजही कायम राहिला. पावसामुळे अनेक ठिकाणी घर-गोठे यांची पडझड होऊन मोठं नुकसान झालं आहे.  दोडामार्ग तालुक्यात एकाचा वीज अंगावर पडून मृत्यू झाला. दरम्यान समुद्र खवळला असल्यान अनेक नौका सुरक्षेसाठी देवगड बंदराच्या आश्रयाला आल्या आहेत. या पावसामुळे महावितरणचं देखील मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल आहे. काही ठिकाणी अजूनही वीज पुरवठा सुरळीत झालेला नाही. तो सुरु करण्यासाठी महावितरणचे कर्मचारी अहोरात्र मेहनत घेत आहेत.

दरम्यान, आंबोली घाटात आज सकाळी दरड कोसळल्यामुळे काल वाहतूक ठप्प झाली  होती.

रत्नागिरी जिल्ह्यात पावसाची संततधार सुरूच असून, संगमेश्वरजवळ काल संध्याकाळी वडाचं झाड कोसळल्यानं कसबा उच्चदाब वीजवाहिनीचे सहा खांब वाकले. त्यामुळे अनेक भागांचा विद्युतपुरवठा खंडित झाला.

लातूर जिल्ह्यात पावसामुळे पिकांचं आणि फळबागांचं मोठं नुकसान झालं आहे.

**<><><><>**

येत्या दोन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात जोरदार ते अती जोरदार पाऊस पडेल, असा हवामान विभागाचा अंदाज असून उद्या रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यासाठी रेड अलर्ट जारी केला आहे, मुंबईतल्या प्रदेशिक हवामान केंद्राच्या शास्त्रज्ञ शुभांगी भुते यांनी सांगितलं…

**होल्ड- बाईट - शुभांगी भुते (२८ सेकंद)**

**<><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज अहमदाबाद इथं गुजरात टायटन्स आणि लखनऊ सुपर जायंटस् यांच्यात सामना होणार आहे. थोड्याच वेळात, साडेसात वाजता हा सामना सुरु होईल. गुजरात टायटन्स नं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला.

**//<><><><>//**